# ९. शाळा सोडल्याच्या दाखल्यात मुस्लिम जातीच्या उल्लेखाबाबत

## महाराष्ट्र शासन

क्रमांक : सीबीसी १०९५/प्र. क्र. २३६/मावक-५
समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २२ जुलै, १९९६

प्रति,
संचालक,
समाजकल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे

विषय : **मुस्लीम ओ. बी. सी. चे जातीचे दाखले पडताळणीबाबत**

मुस्लीम जातींचा इतर मागासवर्गामध्ये समावेश आहे त्यांना जातीचे दाखले देताना कोणत्या बाबी विचारात घ्याव्यात याबाबतीत शासन पत्र क्रमांक सीबीसी-१०९५/प्र.क्र. २२६/मावक-५ दिनांक १९-१०-९५ अनुसार खुलासा केला आहे. त्या खुलाशाच्या आधारे मुस्लीम जातीच्या इतर मागासवर्गीयांना जातीची प्रमाणपत्रे दिली जातात. जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून जाती प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात येते.

२. शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक सीबीसी १६८४/गोप/५९२ (१९९९), बीसीडब्ल्यू-५, दिनांक १६/१०/८५ सोबतच्या परिशिष्ट ''अ'' मधील अनु. क्र. १ मध्ये जाती प्रमाणपत्र पडताळणीसाठी सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील दिला आहे. मुस्लीम जातीच्या बाबतीत जातीचा उल्लेख नसल्यामुळे त्या तपशीलापेक्षा कितीही खोलवर तयारी केली तरी मुस्लीम जातीच्या बाबतीत विशिष्ट जातीचा उल्लेख आढळण्याची शक्यता कमी वाटते. या जातीच्या बाबतीत फक्त मुस्लीम किंवा मुसलमान असाचा शब्द बहुतांश आढळण्याची शक्यता असते म्हणून मुस्लीम जातीच्या जाती प्रमाणपत्रांची पडताळणी करताना या मुद्याचाही विचार करावा. मात्र संबंधित व्यक्ती ही त्याच जातीची आहे याची खात्री गृहचौकशी व इतर बाबी तपासून पाहणे आवश्यक आहे.

**(स. नु. गावीत)**
**अवर सचिव**
**महाराष्ट्र शासन**